
दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
**वर्ष : ०४**, अंक : ८९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com
बुलडाणा, सोमवार, दि.११ नोव्हेंबर २०२४



हिंदू-मुस्लिम एकतेसाठी झटणारे व पहिले शिक्षण मंत्री
मौलाना अबुल कलाम आझाद
11 नोव्हेंबर त्यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय शिक्षण दिवस म्हणून साजरा करतात. त्यांच्या कार्यासाठी त्यांना अभिवादन!!
जयंती निमित्त विनम्र अभिवादन

# मविआ म्हणजे विकास विरोधी आघाडी : अमित शहांचे टीकास्त्र

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, बुलडाणा :** महाविकास आघाडी म्हणजे विकास प्रकल्प विरोधी आघाडी आहे. या आघाडीने विकासाला कायम विरोध केला असल्याची टीका भाजप नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली आहे.

तुष्टीकरणाचे गलिच्छ राजकारण करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने इतर मागासवर्गीय समूहाला आरक्षण देण्यात अगदी नेहरूंच्या काळापासून कडवा विरोध केला असून आजही काँग्रेस ओबीसी विरोधीच असल्याचा घणाघाती आरोपही शहा यांनी केला. यामुळे आघाडीला पराभूत करण्याचे आवाहन करतानाच राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यावर लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर मतदारसंघाचे भाजपा तथा युतीचे उमेदवार माजी आमदार चैनसुख संचेती यांच्या प्रचारार्थ आज अमित शहा यांची जंगी प्रचार सभा मलकापूर येथे पार पडली. जनता महाविद्यालयाच्या भव्य मैदानात पार पडलेल्या या सभेला युतीच्या नेत्यांसह



कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठी गर्दी जमली. यामुळे ही सभा युतीचे शक्तिप्रदर्शन ठरले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, उमेदवार माजी आमदार चैनसुख संचेती, आमदार संजय कुटे, आकाश फुंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अमित शहा यांनी म हाविकास आघाडी, काँग्रेस पक्ष आणि अधूनमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांना लक्ष्य करीत खरपूस टीका केली.

महाविकास आघाडी म्हणजे विकास विरोधी आघाडी अशी व्याख्या करीत ते म्हणाले की आघाडीने राज्यातील प्रत्त्येक मोठ्या विकास प्रकल्पाला विरोध केला आहे. बुलेट ट्रेन, मुंबई मेट्रो, कोस्टल रोड असो की धारावी प्रकल्प, वैनगंगा पैनगंगा नदी जोड योजना असो की पुणे आउटर लिंक रोड असो आघाडीने कायम विरोधाची भूमिका घेतली आहे.

विकासाच्या कामात खोडा घालण्याचे पापच केले आहे. तसेच केंद्रात सत्तेत असताना महाराष्ट्र राज्याला निधी देताना आखडता हात घेतला आहे. २००४ ते २०१४ दरम्यान केंद्रात सरकार असताना महाराष्ट्राला किती निधी दिला याचे उत्तर काँग्रेसने द्यावे असे आव्हान मी केले. मात्र काँग्रेसने याचे उत्तर दिले नाहीये. मात्र मी 'बनिया पुत्र' असल्याने याचा हिशोबच सोबत घेऊन आलो आहे. काँग्रेसवरील कालावधीत राज्याला १ लाख ९१ हजार कोटींचा विकास निधी दिला.

या तुलनेत भाजप सरकारने २०१४ ते२०२४ दरम्यान राज्याला १० लाख १५ हजार ८९० कोटींचा निधी दिला आहे. युतीच्या जेमतेम अडीच वर्षात काळात झालेली प्रगती शरद पवारांसह आघाडीच्या नेत्यांनी पहावी. त्यांनी विकसित विदर्भ, उत्तर महाराष्ट्र पाहावं असे खुले आव्हान त्यांनी दिले. तुमच्या चार पिढ्या आल्या तरी आरक्षण आणि कलम ३७० कलम रद्द होणे नाही.

काँग्रेस सुरुवातीपासूनच ओबीसी आरक्षणच्या विरोधात आहे. पंतप्रधान नेहरू यांनी ओबीसींना आरक्षण देण्याची शिफारस करणारा काकासाहेब कालेलकर समितीचा अहवाल दाबून ठेवला. इंदिरा गांधींनी मंडल आयोगाचा अहवाल थंड बस्त्यात ठेवला. याउलट नरेंद्र मोदींनी ओबीसींना आरक्षणाची व्याप्ती वाढविली. सर्व संस्थांत २७ टक्के आरक्षण दिले, मागासवर्गीय आयोगाला संवैधानिक संस्थाचा दर्जा दिल्याचे गृहमंत्री शहा म्हणाले.

# निवडणूक कर्तव्य नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर शिस्तभंग कारवाई करणार - अशोक शिनगारे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, ठाणे :** निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून ही मतदान प्रक्रिया पार पाडण्याकामी विविध शासकीय, निमशासकीय आस्थापनांतील अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु अनेकजण निवडणुकीचे काम नाकारण्यात धन्यता मानीत असल्याचे तसेच कामात टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

पाच वर्षातून एकदा होणाऱ्या निवडणुकीतील या राष्ट्रीय कर्तव्यास नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात दि.२० नोव्हेंबर रोजी २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तसेच २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष आणि तेवढेच म्हणजे ७ हजार ७१७ मतदान अधिकारी व १५ हजार ४३४ इतर मतदान अधिकारी अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण देखील पूर्ण झालेले आहे. परंतु अनेक कर्मचारी त्यांना प्राप्त झालेले निवडणूक कर्तव्य आदेश रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच यासाठी अनेक जण विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या शिफारशी घेवून तसेच आजारपणाचा दाखला घेवूनही मोठ्या प्रमाणावर येत असल्याची बाब समोर आली आहे. ज्यांच्या आरोग्यविषयक अडचणी खऱ्या आहेत त्यांच्याबाबतीत प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतली आहे.

तथापि निवडणूक प्रक्रिया पार पडण्यासाठी म नुष्यबळाची नितांत आवश्यकता असून कर्मचाऱ्यांकडून अशा पध्दतीचे वर्तन अपेक्षित नसल्याचेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले आहे.

निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील अथवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार थेट कारवाई करावी, असे निर्देश ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जिल्हा निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आले आहेत.

# मविआच्या उमेदवार राणीताई लंके यांच्या प्रचारार्थ नांदूरपठार येथे बैठक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या प्रचार फ ेरीत लेझिमचा डाव रंगला. लयबध्द लेझिम खेळणाऱ्या नागरीकांनी रॅलीत सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांची लक्ष वेधून घेतले. नांदूरकरांनी केलेल्या या अनोख्या स्वागताना राणी लंके या भारावून गेल्या. रविवारी उमेदवार लंके यांचे नांदूरपठार येथे आगमन झाल्यानंतर लेझिमच्या डावाबरोबरच पारंपारिक सनई, ढोल व ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले.

मिरवणूकीने बैठकीच्या ठिकाणी पोहचल्यानंतर राणी लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधताना येत्या २० तारखेला आपणास मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना लंके म्हणाल्या, जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये काम करताना आपण सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये केलेल्या कामाचे म ुल्यमापन करून महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपणास विधानसभा निवडणूकीच्या उमेदवारीची संधी दिली.



या संधीचे सोने करून जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये केलेल्या कामाप्रम ाणेच विधिमंडळात आपण काम करून दाखवू अशी ग्वाही लंके यांनी दिली.

निवडणूकीच्या प्रचारानिमित्त म तदारसंघातील प्रत्येक गावामध्ये प्रचाराची एक फेरी पुर्ण झाली असून प्रत्येक गावामध्ये मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. खा. नीलेश लंके यांनी गेल्या पाच वर्षात केलेले काम मतदारांना भावले असून त्याची आठवण करीत विधानसभा निवडणूकीमध्ये आपणास साथ देण्याची ग्वाही त्यांच्याकडून देण्यात येत असल्याचे लंके यांनी सांगितले. यावेळी रामदास वलवे, दत्तात्रय चौधरी, भागा बुवा चौधरी, नाना महाराज चौधरी, सोनिया राजदेव, नामदेव देशमाने, मारूती रेपाळे, अर्जुन देशमाने, अशोक घुले, म ोहनराव रोकडे, सुवर्णा धाडगे, प्रियंका खिलारी, राजूशेठ चौधरी, रविंद्र राजदेव आदी उपस्थित होते.

**एकशिक्की मतदान देणार !**

स्वातंत्र प्राप्तीनंतर प्रथमच नांदूरपठार गावामध्ये कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लागली असून नांदूरपठारची वाटचाल आदर्श गावाकडे सूरू आहे. खासदार निलेश लंके यांनी गावासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिल्याने लोकसभा निवडणुकीत नांदूरपठारच्या गावकऱ्यांनी त्यांना भरभरून मते दिली. आता विधानसभा निवडणुकीत आम्ही राणीताई लंके यांना एकशिक्की मतदान देणार आहोत.

**-- रविंद्र राजदेव, माजी सरपंच, नांदूरपठार**

महिला सक्षमीकरणाचा पुरस्कार करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी माझ्यासारख्या महिलेला उम ेदवारी देत महिला वर्गाला न्याय दिला आहे. विधिमंडळात आपले प्रतिनिधीत्व एक महिला करणार असल्याने म तदारसंघात प्रत्येक गावातील महिलांचे मला पाठबळ मिळत आहे. प्रत्येक बैठकीत महिलांची संख्या लक्षणीय असते.

**-- राणीताई लंके, महाविकास आघाडीच्या उमेदवार**

# सामुहिक मतदार प्रतिज्ञा घेत मतदानाचा निर्धार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, नवी मुंबई :** २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही म तदान करणार असा निर्धार करीत तुम्हीही मतदान करा असे आवाहन नवी मुंबईत ठिकठिकाणी स्वीप कार्यक्रमांतर्गत आयोजित केलेल्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने केले. निवडणूक आयोगामार्फत ८ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर या कालावधीत स्वीप कार्यक्रमांतर्गत विशेष उपक्रम राबविण्याचे सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, स्वीपचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक दिवशी राबवावयाच्या उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत ८ नोव्हेंबर रोजी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महापालिका आयुक्तांसमवेत सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रितपणे सामूहिक मतदार प्रतिज्ञा ग्रहण केली. त्याचप्रम ाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८ विभाग कार्यालयांमध्ये तेथील सहाय्यक आयुक्त यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित नागरिकांसह मतदार प्रतिज्ञा घेतली. त्याचप्रमाणे विविध ठिकाणी नागरिकांना एकत्र करून त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले आणि त्यांच्यासह मतदार प्रतिज्ञा सामूहिकरित्या घेण्यात आली.

# ठाणे जिल्ह्यातील ७२ लाख २१ हजार ३३१ मतदार करणार मतदान

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक करिता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. तर दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल.

ठाणे जिल्ह्यात १३४ ते १५१ असे एकूण १८ विधानसभा मतदारसंघ आहेत. ठाणे जिल्ह्यात दि.२९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार आहेत. यामध्ये **पुरुष मतदार**– ३८ लाख ४५ हजार ४२, **महिला मतदार**– ३३ लाख ८२ हजार ८८२, **इतर/तृतीयपंथी मतदार**– १ हजार ४१५ आहेत. तसेच यामध्ये **सैनिक मतदार**– १ हजार ६०३, **एनआरआय मतदार**– ९७८, दिव्यांग ३८ हजार १४९, १८–१९ वयोगटातील १ लाख ७२ हजार ९८१ मतदार तर ८५ पेक्षा अधिक वयोगटातील ५६ हजार ९७६ मतदार आहेत.

तरी, पात्र मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिरवळ येथे जुगार अड्ड्यावर सातारा पोलीसांचे धाडसत्र ४५ जणांवर गुन्हे दाखल

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**



**दि.१०, खंडाळा (सातारा) :** शिरवळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुणे–सातारा महामार्गापासून ३००–४०० मीटरवर असणाऱ्या धनगरवाडी (ता. खंडाळा) येथील एका नामांकित जुगार अड्यावर साताऱ्याच्या अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी पोलीस सहकाऱ्यांसह गुरुवारी (दि.३१ ऑक्टोबर) रात्री छापा टाकला. यामध्ये तब्बल ४५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १ कोटी १ लाख २० वीस हजार ३० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सातारा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,अपर पोलीस अधीक्षक डॉ.वैशाली कडुकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, धनगरवाडी (ता.खंडाळा) हद्दीतील डॉ.जगताप हॉस्पिटलच्या पाठीमागे पोल्ट्री फार्मच्या शेडमध्ये काही जण तीन पानी पत्त्याचा जुगाराचा अड्डा चालवत आहेत. त्यानंतर त्यांनी तातडीने स्वत तसेच भुईंज पोलीस ठाणे व शिरवळ पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी त्यांना एकूण ४३ इसम जुगार खेळत असल्याचे दिसून आल्याने त्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगार साहित्य, विदेशी दारु, बिअर, मोबाईल हॅन्डसेट तसेच ६ चारचाकी वाहने व १४ दुचाकी वाहने असा एकूण १ कोटी ९ लाख २० वीस हजार ३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार खेळणारे ४३ व्यक्ती, जुगार अड्डा चालक व पोल्ट्री शेड मालक असे एकूण तब्बल ४५ जणांवर शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक,कोल्हापूर परिक्षेत्र, समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, पोलीस निरीक्षक संदिप जगताप, सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे तसेच आर.सी.पी.प्लाटून मधील पोलीस अंमलदार व शिरवळ पोलीस ठाणे व भुईज पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार यांनी केली असून कारवाई मधील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर व समीर शेख पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

# ठाणे जिल्ह्यातील ७२ लाख २१ हजार ३३१ मतदार करणार मतदान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. तर दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल.

ठाणे जिल्ह्यात १३४–भिवंडी ग्रामीण (अ.ज.), १३५–शहापूर (अ.ज.), १३६–भिवंडी पश्चिम, १३७–भिवंडी पूर्व, १३८–कल्याण पश्चिम, १३९–मुरबाड, १४०–अंबरनाथ (अ.जा.), १४१–उल्हासनगर, १४२–कल्याण पूर्व, १४३–डोंबिवली, १४४–कल्याण ग्रामीण, १४५–मिरा भाईंदर, १४६–ओवळा माजिवाडा, १४७–कोपरी पाचपाखाडी, १४८–ठाणे, १४९–मुंब्रा कळवा, १५०–ऐरोली, १५१–बेलापूर असे १८ विधानसभा म तदारसंघ आहेत.

मतदारसंघाचे एकूण मतदार:–

ठाणे जिल्ह्यात दि.२९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ७२ लाख २९ हजार ३३९ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार: ३८ लाख ४५ हजार ४२, महिला मतदार: ३३ लाख ८२ हजार ८८२, इतर/तृतीयपंथी मतदार: १ हजार ४१५ आहेत. तसेच यामध्ये सैनिक मतदार: १ हजार ६०३, एनआरआय मतदार: ९७९, दिव्यांग ३८ हजार १४९, १८–१९ वयोगटातील १ लाख ७२ हजार ९८१ मतदार तर ८५ पेक्षा अधिक वयोगटातील ५६ हजार ९७६ मतदार आहेत.

तरी, पात्र मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदान करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## संपादकीय



### रतन टाटा

श्री.रतन टाटाजी आपल्याला सोडून गेले त्याला एक महिना झाला आहे. गजबजलेल्या शहरांपासून ते छोटी शहरे, अगदी गावांपर्यंत, समाजातल्या प्रत्येक क्षेत्रात त्यांची उणीव तीव्रतेने जाणवत आहे. प्रस्थापित उद्योगपती, होतकरू उद्योजक आणि मेहनती व्यावसायिक सर्वांनीच त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पर्यावरणाप्रति सजगता आणि परोपकाराला वाहून घेतलेल्या प्रत्येकालाही तितकेच दुःख झाले. देशाला तर टाटा यांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवली, त्याचबरोबर जगालाही ती जाणवली.

युवकांसाठी रतन टाटा प्रेरणास्थान होते. स्वप्ने ही साकारायची असतात, करुणा आणि विनम्रता बाळगत यश साध्य होऊ शकते, याचे स्मरण रतन टाटा करून देतात. भारतीय उद्योजकतेची सर्वोत्तम परंपरा त्यांनी रुजवली आणि प्रामाणिकपणा, उत्कृष्ट दर्जा आणि सेवा या मूल्यांप्रति ते कायम ठाम राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने आदर, सचोटी आणि विश्वासार्हता जपत जगभरात नवी शिखरे गाठली. तरीही अतिशय विनम्रतेने आणि दयाळूपणे त्यांनी हे यश स्वीकारले.

इतरांची स्वप्ने सत्यात उतरवण्यासाठी त्यांना पाठबळ देणे, हा टाटा यांच्यातील आणखी एक अनोखा गुण होता. अलीकडच्या वर्षात भारताच्या स्टार्ट अप परिसंस्थेचे मार्गदर्शक म्हणून ते ओळखले जात असत. अनेक आशादायी प्रकल्पांमध्ये त्यांनी गुंतवणूक केली. युवा उद्योजकांच्या आशा- आकांक्षा त्यांनी जाणल्या आणि भारताच्या भविष्याला आकार देण्याची त्यांची क्षमता ओळखली. अशा युवांना पाठबळ देत धाडस आणि पूर्ण क्षमतेनिशी काम करण्यासाठी अशी स्वप्ने पाहणाऱ्या पिढीला त्यांनी सबल केले. यातून नवोन्मेष आणि उद्योजकतेची संस्कृती निर्माण होण्यासाठी मोठी मदत झाली आणि याचा सकारात्मक प्रभाव येणाऱ्या अनेक दशकांमध्ये कायम राहील याचा मला विश्वास आहे.

त्यांनी नेहमीच सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार केला आणि भारतीय उद्योगाने जागतिक मापदंड स्थापित करण्याचा आग्रह ठेवला. हा दृष्टिकोन भारताला, जागतिक तोडीची गुणवत्ता बनवण्यासाठी आपल्या भावी उद्योजकांना प्रेरणा देत राहील याचा मला विश्वास आहे.

बोर्डरूम किंवा सहकाऱ्यांपुरतेच टाटा यांचे थोरत्व मर्यादित नव्हते. सर्व मानवतेप्रति त्यांची परोपकारी दृष्टी होती. प्राण्यांप्रति त्यांचा दयाळूपणा सर्वपरिचित आहे, प्राण्यांच्या कल्याणासाठीच्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांचे सहकार्य राहिले. एखाद्या व्यवसाय प्रकल्पाप्रमाणेच त्यांच्या जीवनाचा भाग बनलेल्या त्यांच्या श्वानाचे फोटो ते अनेकदा सामायिक करत. एखाद्याचं नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व केवळ त्याच्या कामगिरीनेच नव्हे तर दुर्बलांची काळजी घेण्याच्या क्षमतेने मापले जाते, याचे स्मरण टाटा यांच्या जीवन परिचयातून होते.

देशावर आलेल्या संकटांच्या काळात रतन टाटा यांची देशभक्ती अधिक प्रखर आणि तेजस्वी ठरली होती. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईतील प्रतिष्ठित ताज हॉटेल झपाट्याने उघडण्याची त्यांची कृती म्हणजे भारत दहशतवादापुढे न झुकता एकजुटीने उभा आहे, हा संदेश संपूर्ण राष्ट्राला देऊन गेली.

व्यक्तिगतरीत्या मला अनेक वर्षांपासून त्यांना जवळून जाणून घेण्याचा विशेषाधिकार मिळाला. आम्ही गुजरातमध्ये जवळून काम केले, जिथे त्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली, यातील अनेक प्रकल्पांवर त्यांचा खूप जीव होता. काही आठवड्यांपूर्वी, मी स्पेन सरकारचे अध्यक्ष श्री. पेड्रो सांचेझ यांच्यासमवेत वडोदरा येथे होतो आणि आम्ही संयुक्तपणे एका विमान संकुलाचे उद्घाटन केले जेथे सी-२९५ विमाने भारतात बनवली जातील. रतन टाटा यांनीच यावर काम सुरू केले होते. त्यावेळी रतन टाटा यांची अनुपस्थिती आम्हाला फारच जाणवली हे वेगळे सांगायला नको.

मला रतन टाटाजी हे पत्रलेखक म्हणूनही स्मरणात आहेत – ते वारंवार मला निरनिराळ्या मुद्द्यांवर पत्र लिहित असत, मग ते प्रशासनाचे विषय असोत, सरकारच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे असो किंवा निवडणूक विजयानंतर अभिनंदनाच्या शुभेच्छा असोत.

जेव्हा मी केंद्र सरकारमध्ये गेलो तेव्हाही आमचा निकटचा संवाद कायम राहिला आणि ते आमच्या राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमधील एक वचनबद्ध भागीदार राहिले. रतन टाटा यांनी स्वच्छ भारत मिशनला दिलेला पाठिंबा विशेषत्वाने माझ्या हृदयाच्या जवळ होता. भारताच्या प्रगतीसाठी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि साफसफाई अत्यावश्यक आहे हे समजून ते या लोकचळवळीचे मौखिक पुरस्कर्ते बनले. ऑक्टोबरच्या सुरुवातीला स्वच्छ भारत मिशनच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त त्यांनी दिलेला मनस्वी व्हिडीओ संदेश मला अजूनही आठवतो. हे त्यांच्या काही शेवटच्या सार्वजनिक दर्शनांपैकी एक होते.

# शिक्षण दिन ; मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन

आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते.

अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती. अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज



सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत.

मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत. अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मतदान प्रक्रिया नि:पक्षपातीपणे व पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी राजकीय पक्षांच्या उमेदवारांची बैठक

**दि.१०, ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत आहे. या मतदानाच्या पार्श्वभूमीवर आतापर्यत करण्यात आलेली पूर्वतयारी व उर्वरित निवडणूक प्रक्रियेची माहिती देण्यासाठी राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (९ नोव्हेंबर) आयोजित केली होती. संपूर्ण मतदान प्रक्रिया नि:पक्षपातीपणे व पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी या मतदान प्रक्रियेदरम्यान उपस्थित असलेले उमेदवार तसेच त्यांच्या प्रतिनिधींनीही जिल्हा निवडणूक विभागास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील,आचारसंहिता कक्षाच्या सहाय्यक समन्वय अधिकारी सुकेशिनी पगारे आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीतजिल्ह्यातील १८ विधानसभा मतदार संघामध्ये ८५ वर्षावरील व दिव्यांग मतदारांचे गृहमतदान सुरू असून ही सर्व प्रक्रिया मतदान अधिकाऱ्यांसमेवत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमवेत सुरू असल्याचे सांगण्यात आले. तसेच ११ ते १५ नोव्हेंबर २०२४ दरम्यान १८ विधानसभा मतदारसंघात एतच्



ेाळीीळेपळपस चे काम निवडणूक निरीक्षक यांच्या उपस्थितीत होणार असून त्यावेळी उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेचे निरिक्षण करावे, तसेच अभिरुप मतदान करुन स्वत:चे समाधान करुन घेण्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली.

EVM² Commissioning वेळी उमेदवार किंवा उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या प्रतिनिधींनी मतदान यंत्रावर लावण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सीलवर व सुरक्षा कक्षाच्या सीलवर उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली जाणार आहे. मतदान पथके मतदान केंद्रासाठी रवाना होताना दिनांक १९/१७/२०२४ रोजी सुरक्षा कक्ष उघडताना तसेच ईव्हीएम मतदान पथकाच्या ताब्यात देणे व नंतर सुरक्षा कक्षात सीलबंद करतेवेळी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी सुरक्षा कक्षात उपस्थित राहून प्रक्रियेचे निरीक्षण करावयाचे आहे. मतदानाच्या दिवशी दिनांक २०/११/२०२४ रोजी उमेदवार प्रत्यक मतदान केंद्रास एक या प्रमाणे मतदान प्रतिनिधी असणे आवश्यक आहे.

नेमलेल्या मतदान प्रतिनिधीसमोर संपूर्ण मतदान प्रक्रिया पार पडेल. सुरूवातीला सकाळी ६.०० वाजता मॉकपोल सुरू होईल त्यावेळी उमेदवार/ निवडणूक प्रतिनिधी/ मतदान प्रतिनिधी अभिरुप प्रक्रियेचे निरिक्षण करु शकात तसेच सीलचे निरिक्षण करु शकतील. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मतदान प्रतिनिधीस १७ सी भाग -१ ची प्रत दिली जाईल, ज्यामध्ये यंत्राचे क्रमांक नमूद असतील, मतदान प्रतिनिधींनी प्राप्त केलेले १७ सी भाग -१ उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी प्रतिनिधीकडे देऊन त्या आधारे मतमोजणीसाठी समोर आलेले कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅटचे निरीक्षण व पडताळणी करु शकतील असेही या बैठकीत नमूद करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणूक प्रक्रिया ही अत्यंत नि:पक्षपातीपणे व पारदर्शक पध्दतीने होण्यासाठी मतदान प्रक्रियेची संपूर्ण निरीक्षण हे मतदान अधिकाऱ्यांसोबतच उमेदवार तसेच त्यांनी नेमलेल्या प्रतिनिंधीसमक्ष करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले. यावेळी उमेदवारांच्या प्रतिनिधींनी त्यांना असलेल्या शंका उपस्थित केल्या व त्या शंकाचे निरसन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले.

## निवडणूक..

खूप काही देते घेते
मजेदार निवडणूक
नेते भलते विदुषक
रोजनवी करमणूक

स्वता:च केला गुंता
करुपाहे सोडवणूक
साहेब येणार सभेत
सामान्यां अडवणूक

असेअसावेत पुढारी
नेत्यांचीकरे वर्णणूक
युती आघाडी करता
अनिवार्य रे घाटणूक

खजिना केलाखाली
आश्वासन गुंतवणूक
जाणी सगळे दुर्भिक्ष
कुणी केली अटणूक

स्पष्टप्रश्न विचारताचं
कशीहोई अडचणूक
बोले केले खूपकाही
जनते नसे अराणूक

मतदाराहाती सुकाणूं
मतदानां दिसो चुणूक
निकाला नंतर आराम
असह्यझाली दमणूक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# लाभार्थी कार्यकर्ते गरजले, मात्र शरद पवारांचे मौन

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१०, उदगीर (लातूर) :** महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारात शरद पवारांची सभा झाली या सभेत शरद पवार यांनी महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे यांच्यावर टीका तर सोडाच परंतु त्यांचा उल्लेख सुद्धा आपल्या भाषणात केला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फुटी नंतर अजित पवार गटात गेलेल्या आमदार व विशेष नऊ मंत्र्यांच्या विरोधात शरद पवारांनी पॉवर गेम लावून आमदारांना पराभूत करण्याची रणनीती अकल्याची चर्चा अनेक ठिकाणी चर्चिली जात आहे शनिवारी उदगीरात महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारात शरद पवारांची सभा झाली या सभेत शरद पवार यांनी महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे यांच्यावर टीका तर सोडाच परंतु त्यांचा उल्लेख सुद्धा आपल्या भाषणात केला नाही त्यामुळे जमलेल्या सर्व मतदारत आश्चर्य व्यक्त केले जात असून त्यांची जोरदार चर्चा मतदारसंघात सुरू आहे.



महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ उदगीर येथील क्रीडा संकुलावर राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची सभा झाली महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे हे शरद पवारांची साथ सोडून अजित पवार गटात गेल्याबद्दल काय टीका करणार? काय बोलणार? या याकडे सर्वांच्या नजरा होत्या या सभेत लाभार्थी मोठमोठ्याने गरजले मात्र शरद पवारांनी महाविकास आघाडीला धक्का देत बनसोडे यांचे पूर्ण भाषणात नाव सुद्धा न काढल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे .

उदगीरातील शनिवारची सभा सुरू झाल्यानंतर शरद पवार येण्याआधी पासून अनेक लाभार्थी कार्यकर्त्यांची भाषणे झाले त्यानंतर माजी मंत्री अमित देशमुख यांचे भाषण झाले त्यांनी बनसोडे यांचा समाचार घेत लातूरचे पार्सल लातूरला पाठवा असे आवाहन केले करोडो रुपयांच्या योजनांचा लाभ घेणारे लाभार्थी अत्यंत पोट तिडकीने बनसोडे यांच्यावर कडकडाडून टीका करत होते शरद पवार यांच्या उपस्थिती ही अनेक कार्यकर्त्यांनी बनसोडे यांच्यावर टीका केली मात्र शरद पवारांनी बनसोडे यांचे नाव न घेता महाविकास आघाडीला चांगलाच धक्का दिला अशी चर्चा मतदारसंघात जोरदार रंगली आहे सुरुवातीपासूनच उदगीर मतदार संघात महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे यांची प्रचारात आघाडी घेतल्याची चर्चा होती मात्र शरद पवारांच्या सभेनंतर काय होईल? शरद पवार काय बोलणार? बनसोडे यांच्यावर काय टीका करणार? यावरच वातावरण कोणत्या मोडवर जाणार हे सांगता येईल असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत होते मात्र शरद पवारांचे मौन हे बरेच काही सांगून गेले अशी चर्चा जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

# यश तोडमल या खेळाडूने पटकावले ब्राँझ पदक

**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.१०, राहुरी (अहिल्यानगर) :** मुंबई मधील विरार येथे दि.९ नोव्हेंबर २०२४ रोजी ११ ते १४ वयोगटातील पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य स्टेट लेव्हल रोलर स्केटिंग कॉम्प्युटिशन स्पर्धेत राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथील रहिवासी असलेला व मौर्य अकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूल राहुरी येथे इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेला यश दगडू तोडमल या विद्यार्थ्याने तिसरा क्रमांक पटकावत ब्राँझ पदक मिळविले आहे,




तसेच या सुमार कामगिरीच्या बळावर यश दगडू तोडमल या खेळाडूची मैसुर येथे होणाऱ्या नँशनल लेव्हल साठी निवड झाली असून त्याची निवड झाल्याबद्दल यश यास RTSA स्केटिंगचे प्रशिक्षक ऋषिकेश तारडे सर आणि त्यांचे सहकारी सुनिल पाले यांचें यशचे पालक दगडू तोडमल यांनी त्यांचे आभार मानले आहे,

तसेच यशच्या कामगिरी बद्दल मौर्य अकॅडमी इंग्लिश मिडीयम स्कूलमधील प्राचार्य व शिक्षक वर्ग तसेच राहुरी खुर्दच्या सरपंच मालतीताई साखरेचे व माजी सरपंच सचिन शेटे, माजी उप सरपंच उमेश बाचकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, बिरु ठोंबरे, पत्रकार रमेश खेमनर यांच्यासह अनेकांकडून यशच्या कामगिरीचे कौतुक होत आहे,


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज
३ बुलडाणा, सोमवार, दि.११ नोव्हेंबर २०२४ संमिश्र

# थोडक्यात

## संरक्षण

बरी होते मी उदरात
कारण सुरक्षित नाही या जगात
खुप आतुरता होती जन्माची
आई बाबांच्या सहवासाची
म्हणुनच बरी होते ...........
अंतरळात पोहचल्या मुली
तेवढी प्रगती त्यानीं केली
तरीही संरक्षणाची चिंता निर्माण झाली
म्हणुनच बरी .......
झेलेन संकटे कितीही
स्विकारेल सुखा बरोबर दु:खही
नको ती लाडकी बहीण
नको ते आरक्षण
आम्हाला हवे आहे ते
फक्त संरक्षण.

**- कवियत्री**
**सोनाली शिंदे, ठाणे.**

# दिवा शहरात मनसेचे उमेदवार राजू पाटील यांना जनतेचा चांगला प्रतिसाद



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, दिवा (ठाणे) :** १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत मा.प्रमोद(राजुदादा) पाटिल यांच्या प्रचारार्थ दिवा मतदार संघात दिवा शहरात प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० :०० वाजता ठिकाण : गावदेवी मंदिर, दिवा येथून गावदेवीचे दर्शन घेऊन सुरुवात झाली. नगवाडी,

क्रिश कॉलोनी, एन आर नगर, हनुमान मंदिर, प्रेम नगर, गणेश चौक, विनोद भगत, चेतन भगत, बंदर अळी, म्हात्रे आळी, मधली, अळी, बलदा नगर, दिवा पूर्व तलाव, साबे रोड, साबे गाव, मुंब्रा कॉलोनी रोड, दातिवली गाव, म्हातरडी गाव, बेतवडे गाव, आगासान गाव, आगासन रोड, दिवा चौक, मनसे आमदार कार्यालय, येथे समाप्ती झाली. दिवा शहरातील सर्व नागरिकांनी राजू पाटील दादा यांना प्रतिसाद दिला आहे.

पुन्हा राजू दादा हे निवडून येतील आणि मंत्री होतील असे दिवा शहरातील नागरिकांनी आमदार राजू पाटील यांना आश्वासन दिला आहे. एकच वादा आमचा राजू दादा, पुन्हा मनसे मनसे हा जल्लोष पाहायला मिळाला. दिवा शहरात आमदार राजू दादा पाटील यांनी अनेक कामे केली आहेत. त्यामुळे दिव्यातून त्यांना प्रतिसाद मिळत आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मध्ये १३ उमेदवार आहेत. त्यापैकी मनसेचे कल्याण ग्रामीण विधानसभेचे उमेदवार प्रमोद (राजू दादा) पाटील यांच्या कामाची सर्वश्रेष्ठ चर्चा होत आहे. यावेळी चांगलीच लढत आपल्याला कल्याण ग्रामीण विधानसभा होणार आहे. महायुतीचे उमेदवार शिवसेनेचे राजेश मोरे, आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार सुभाष भोईर यांच्यामध्ये चांगलीच लढत आपल्याला २० तारखेला पहायला मिळणार आहे. खरंतर कल्याण ग्रामीण मध्ये कट्टर शिवसैनिकांची गोची झाली आहे. मतदान आता कराचे कोणाला. शिंदे गटाला की उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला. शिवसेनेची मते आता दोन भागांमध्ये विभागली जाणार आहेत. याचा फायदा मनसे आमदार राजू दादा पाटील यांना होऊ शकतो. आमदार राजू दादा पाटील नेहमीच म्हणतात मीडियासमोर मी एका मताने सुद्धा निवडून आलो तरी चालेल मला जनतेची कामे करायची आहेत. आणि जनता माला निवडून देणार, दिव्यातील जनतेची मला साथ आहे, दिव्यातील ग्रामस्थांचा आशीर्वाद सुद्धा आहे. दिव्यातील जनतेने मनसेच्या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे.

# कोकणातील एक रस्ता चांगला नाही करू शकत, इतकी वर्षे लागतात कशी ?- राजसाहेब ठाकरे



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१०, गुहागर (शृंगारतळी) :** विधानसभा निवडणुक २०२४ च्या निवडणुकीच्या रिंगणात महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष स्वबळावर लढत असून, यावेळी मनसे सत्तेत असेल असा विश्वास पक्षप्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिला आहे.राजसाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्रभर सभा दौरा सुरू असून शुक्रवार दि.८ नोव्हेंबर २०२४ रोजी कोकणातील उमेदवारांच्या प्रचारार्थ गुहागर येथील शृंगारतळी येथे सभा संपन्न झाली,सभेत बोलताना त्यांनी महाराष्ट्रातील बदलते राजकारण,शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी, कोकणातील पर्यटन विकास, भौतिक परिस्थितीवर भाष्य करण्याबरोबरच पत्रकारांचाही खरपुस समाचार घेतला.

**कोकणात आलो की हे कोकण भुरळच घालतं...**

राजसाहेब ठाकरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हटले आहे की कधीही या कोकणात अलो की हे कोकण भुरळच घालतं, मी जेव्हा जेव्हा परदेशात जातो तेथील डोंगर, समुद्र किनारे वगैरे सर्व पाहतो,डेव्हलप झालेले जेव्हा पाहतो प्रत्येक वेळेला एक खंत, दु:ख वाटते हे तर सगळं परमेश्वराने आम्हाला दिलंय मग आमच्याकडे का होत नाही इकडे,जगात प्रत्येक ठिकाणी होऊ शकते, खरं तर भाग्यवान आहात तुम्ही,असल्या प्रदेशात तुम्ही जन्माला आलात,पण एकाच बाबतीत तुमचं दुर्भाग्य आहे की चुकीची माणसे निवडून दिलीत आजपर्यंत,ज्यांनी स्वतः काही केले नाही,आपापली खळगी भरत आले,मोठे झाले यांचे अनेक फार्म हाऊस झाले,पण या भागात म्हणून काय आले नाही, समस्यांवर बोलताना ठाकरे म्हणाले की इथे काही उद्योग धंदे नसल्यामुळे अनेक तरुण तरुणी मुंबई, पुण्याकडे निघून जातात,अरे मराठवाड्यात,विदर्भात गेलो तरी हेच की आमच्याकडे उद्योग धंदे नसल्यामुळे तरूण,तरुणी मुंबई पुण्याकडे निघून जातात,शिक्षणासाठी जातात, नोकऱ्यांसाठी जातात, मुबंई ,पुण्याचे तरुण,तरुणी तिकडे काही मिळत नसल्यामुळे परदेशी निघुन जातात,

**शिव छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आणि आपण काय करून ठेवलं त्याच?**

हा साडे सातशे किलोमीटर कोकणाला लाभलेली कोकण समुद्र किनारपट्टी आपली,शिव छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आणि आपण काय करून ठेवलं त्याच?काही आमच्याकडे येत नाही त्यावर कुणी बोलत नाही,आमच्याकडे काय येतात तर आमच्याकडे पॉवर प्रोजेक्ट येतात, आमच्याकडे रिफायनरी येतात,

पण जे परमेश्वराने वाढून ठेवलंय आपल्या हातामध्ये, मला खरंच या गोष्टी, या निवडणूकांच या शाहरुख खान, सलमान खान यांच चित्रपट शुक्रवारी पडले ना तर नवीन चित्रपट सोमवारी सुरू करू शकतात पण या निवडणुका हे राजकारण दर पाच वर्षाने निवडणुका येतात तोपर्यंत मधी काही नाही,तुमच्या आयुष्यातील, आमच्या आयुष्यातील प्रत्येक वेळेला पाच पाच वर्षे निघून जाणार,किती वर्षे आपण त्याच त्याच विषयांवर निवडणूक लढवणार आहोत!,प्रत्येक जण इथे येऊन सांगतो मी इथे आलो होतो,तुम्हाला रोजगार आणीन,कसा आणशील? मग आतापर्यंत का नाही आणला,हे कशामुळे होतं याचे कारण तुम्ही प्रश्न विचारत नाही या लोकांना,निवडून दिलेले आतापर्यंतचे आमदार यांना प्रश्न विचारत नाही बाबा तू काय केले आजपर्यंत,इकडची माणसे तरुण-तरुणी मुंबई, पुण्याकडे का जातायत,इतका सुंदर प्रदेश आपला

**रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे तीन जिल्हे अख्खा महाराष्ट्र पोसू शकतात...**

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नुसता टुरिझमवरती हे तीन जिल्हे अख्खा महाराष्ट्र पोसू शकतात, कधी जा केरळमध्ये कोणते प्रकल्प आले,कोणत्या ऑइल रिफायनरी आल्या, अखं राज्य पर्यटन वरती सुरू आहे.

लांब कशाला जाता बाजूच्या गोव्यात जा ना!, एक पर्यटन या विषयावरती अख्खा गोवा सुरू आहे, असे कोणते उद्योग धंदे आले इकडे, इतकं सुंदर कोकण करता येईल की ज्याची कल्पना देखील तुम्ही कधी केली नसेल, ना तुम्हाला घर, गाव, तालुका जिल्हा सोडावं लागेल, जे मिळेल ते तुम्हाला इथेच मिळेल, तुम्हालाच नाही तुमच्या पोरांना देखील इथेच मिळेल,पण ते आता पर्यंत का झाले नाही? याचे कारण तुम्ही त्याच त्याच लोकांना, पक्षांना निवडून दिलत,

**तुम्ही महाराष्ट्राचे एका संपन्न राज्याचे नागरिक आहात ज्याचा इतिहास एवढा मोठा त्या राज्याची हालत बनवून टाकली या लोकांनी,एक स्वाभिमानी कणाच मोडून टाकला**

तुम्ही इथून आमदार, खासदार निवडून देता, हे आमचे खासदार करतायत काय हो दिल्ली मध्ये जाऊन, कोकणच्या विषयवार आतापर्यंत कोणते विषय मांडले गेले,कोकणच्या पर्यटन वरती कोणते विषय मांडले गेले, पण हे विषय सहज शक्य आहेत, आपल्याकडे चांगले हॉटेल आहेहेत नाहीत,त्या हॉटेल,रिसॉर्ट मध्ये लागणारी इंग्लिश स्पिकिंग मुले त्यांचे इन्स्टिट्यूट काढावे लागतात हे काहीही नाही आपल्याकडे,कोणाला काहीही देणं घेणं नाही,काहीही न करता तुम्ही मतदान करत असाल तर करायला कशाला पाहिजे!,काय आवश्यकता आहे, काही न करता दर पाच वर्षांनी तुम्ही रांगे मध्ये उभेच राहणार असाल तर राहा उभे,पिढ्यांच्या पिढया बरबाद करून टाका या सर्वांच्या समोर,हा राज ठाकरे ओरडून ओरडून सतत सांगतोय तुम्हाला, अरे तुम्ही महाराष्ट्राचे एका संपन्न राज्याचे नागरिक आहात ज्याचा इतिहास एवढा मोठा त्या राज्याची हालत बनवून टाकली या लोकांनी,एक स्वाभिमानी कणाच मोडून टाकला या राज्याचा आणि आम्हाला त्या गोष्टींचा दुःखच नाही आम्हाला,आणी तुम्ही असे वागता म्हणून हे राजकारणी असे वागतात, तुमच्या विकासाचा विचार नाही,प्रदेशाचा विकासाचा विचार नाही,नवीन प्रकल्प,उद्योग धंदे आले पाहिजेत याचा विचार नाही,गुंतलेत कशात हा पक्ष त्या पक्षांमध्ये जातोय तो पक्ष या पक्षांमध्ये जातोय, या आघाडीतला हा पक्ष दुसऱ्या आघाडी मध्ये जातोय,इकडे युती मध्ये सरकतोय, चाळीस चाळीस आमदार विकले जातायत,इकडचे तिकडे येतायत पाच वर्षे तमाशा बघताय,२०१९ च्या निवडणुका झाल्यापासून २०२४ पर्यंत हेच उद्योग तुम्ही पाहिलेत,आणि हे सगळं पाहता ते तुम्ही हसण्यावरती न्हेता,आमदार विकला गेला तरी आपण हसतोय,

**पत्रकार टोकदार प्रश्न आम्हाला विचारणार पण हे बाकीच्यांना नाही विचारणार कारण यांची धारच बोथट झालेली आहे.**

सगळे टोकदार प्रश्न आम्हाला विचारणार पण हे आमचे पत्रकार बाकीच्यांना नाही विचारणार कारण यांची धारच बोथट झालेली आहे, हे पत्रकार काहीही वर्तमान पत्रात यांच्या विरोधात काही लिहिणार नाहीत,काही नाही करणार,समोर आले की ह्यांया...ह्यांया,

हु...हु करणार संपला यांचा विषय,अर्थात ह्यांनी लिहून देखील, दाखवून देखील ह्यांना काय फरक पडतोय?ते म्हणतील दाखवा,काय लिहायचे आहे विरोधात लिहा,आम्हाला काहीही फरक पडत नाही,जर लोकांनाच काहीही फरक पडत नाहीये,तर तुम्ही लिहिण्याने आम्हाला काय फरक पडणार आहे,एक काळ होता जेव्हा पत्रकारांना, संपादकांना राजकारणातील लोकं घाबरायचे की बाबा माझ्याबद्दल लिहू नकोस,जरा देखील वाईट लिहू नकोस,एक भीती असायची त्यांच्या मनामध्ये, आता काही नाही कोणाबद्दल कसली भीतीच नाही उरली, अहो तुमच्या बद्दल नाही भीती उरली तर पत्रकारांबद्दल काय उरणार आहे, आणि पुन्हा तुम्ही यांच्यासाठी निवडणुकीसाठी म्हणून रांगे मध्ये उभे राहणार हे त्यांना माहिती आहे,यांना विकासाशी काहीही देणं घेणं नाही,जेव्हढा समाज यांना विधभूत ठेवता येईल,त्याला काही कल्पना नाही,माहिती नाही,त्याच्या पर्यंत कुठची गोष्ट जात नाही, पण एकालाही असे वाटत नाही की आमच्या प्रदेशासाठी ह्यांनी काय केले असे विचारावे असे वाटत नाही,आणि म्हणून हे जे सगळे गोंधळ घालताताना,कोणी कोणत्याही पक्षात चाललाय,आणि कोणी कसाही विकला जातोय,कोणी काही करतंय,ते त्याच्यामुळे सगळ्या गोष्टी होतायत, कारण तुम्ही थंड बसलेले आहात,तुम्ही शांत बसलेला आहात,तुम्हाला स्वतःलाच विकास म्हणजे काय माहिती नाहीये,तुमचे आजोबा, तुमचे वडील, तुम्ही त्याच त्याच गोष्टी ऐकत य लोकांना मतदान करत आलात, विकासाच्या व्याख्याच माहीत नाहीयेत तुम्हाला.

**आमचा कोकणचा रस्ता,सतरा,अठरा वर्षे झाली चालूच आहे बनतोच आहे,आम्हाला काही वाटत नाही त्याचं...!**

या निवडणूका होऊन जाऊ देत,मी येणार आहे परत कोकणामध्ये,तुम्हाला विकास नावाची गोष्ट काय असते ना,जी जगभर झालेली आहे ना,ते तुम्हाला मी दाखवणार आहे काय आहे, विकास म्हणजे असतो तो,आमच्या हातामध्ये जेव्हा नाशिक महानगरपालिका होती त्या नाशिकच्या महानगरपालिका हातामध्ये असताना नाशिक मध्ये ज्या गोष्टी केल्या आज लोकं सांगतायत जरा आज आमचं चुकलं मागच्या वेळी आम्ही तुम्हाला मतदान करायला पाहिजे होतं,कारण जे काम तुम्ही नाशिक मध्ये करून ठेवलत ते नाही कुणी अगोदर पर्यंत केलं ना त्याच्या नंतर झालं, पाच वर्षाच्या आता ज्या गोष्टी नाशिक मध्ये करून दाखवल्या तिकडचे रस्ते जाऊन बघा,आता वाट लागली असेल त्याची,किंवा वाट लावली असेल त्याची,पण जेव्हा ते रस्ते केले,ते रस्ते केल्यानंतर हे पावसाळ्यामध्ये खड्डे पडतात नाही का,सगळीकडे खड्डे पडतात कोकणाला तर नवीन काहीच नाहीये, आमचा हायवे तर तसाच असतो,आमचा कोकणचा रस्ता,सतरा, अठरा वर्षे झाली चालूच आहे बनतोच हाय,आम्हाला काही वाटत नाही त्याचं,आम्हाला राग येत नाही,चीड येत नाही,आम्हाला काहीच वाटत नाही त्या गोष्टींच,खड्ड्यातून जायचं खड्ड्यातून जाऊ, दरीतून जायचं दरीतून जाऊ,पुढे समुद्र आहे समुद्राच्या खालून जाऊ,आम्हाला काय वाटतनासं तस झालेलं आहे,ज्या नाशिक मध्ये जे रस्ते केले,दरवेळेला पावसाळ्यामध्ये आमच्या टेलिव्हिजन चॅनेलवरती दाखवतात पहा पहा मुंबई, पुणे,तुमच्या ठाण्यात कसे खड्डे पडलेत, नागपूर मध्ये कसे खड्डे पडलेत, माझ्यावर विश्वास बसत नसेल नाशिक जा पत्रकारांना भेटा आणि बोला त्यांच्याशी,या पत्रकारांनीच सांगितले तिकडे हेड पत्रकारांनाच सांगायचे नाशिक मधल्या खड्ड्यांचे फुटेज पाठवा आम्हाला, पत्रकार सांगायचे इथे नाशिक मध्ये रस्त्यात खड्डे नाहियेत,कोणते फुटेज पाठवू?अशा प्रकारचे रस्ते तिथे बांधले गेले,ज्यावेळी या रस्त्यांची कंत्राटे दिली गेली,त्यावेळी आयुक्तांच्या समोर या कंत्राटदारांना बोलावलं होतं,आणि त्या कंत्राटदारांना बोलावून सांगितलं होतं का जर रस्त्यांची कंत्राटे दिल्यानंतर रस्त्यात खड्डा दिसला तर त्या रस्त्यात उभा करून मारीन,काय नाही चकाचक,

**महाराष्ट्रातला कोकणातील एक रस्ता चांगला नाही करू शकत,इतकी वर्षे लागतात कशी काय?**

मी मध्यंतर या कोकणाच्या रस्त्यांबद्दल मी नितीन गडकरीना फोन केला, त्यांना म्हटलं इतकी वर्ष झाली आमच्या कोकणतला रस्ता होत नाहीये, ट्रॅफिक जाम होतोय, अनेक महिला, गरोदर महिला, लहान मुले असतात त्याच्या मध्ये ट्रॅफिक जाम होतो, गाड्या तुटतायत, हे सगळं इतकी वर्षे चालू आहे म्हटलं काहीतरी करा याच्याबद्दल,तुम्ही उत्तरेतील राज्यांचे रस्ते चांगले करताय हे आम्हाला कळतंय, महाराष्ट्रातला कोकणातील एक रस्ता चांगला नाही करू शकत,इतकी वर्षे लागतात कशी काय, त्यावर मला म्हटले अहो काय सांगू,ते सगळे कंत्राटदार होते ते पळून गेले, त्यावर राजसाहेब यांनी भाष्य केले की कारण ती इकडच्या लोकांना दिलेली असणार सगळी कामे,कंत्राटी दिलेली असणार त्यात सगळी टक्केवारी काढून घेतली असणार,कंत्राटदाराकडे उरले नसणार पैसे, अनेक कारणे असतील त्याला पण रस्ता झाला नाही हे तरी सत्य,असे जगात कुठेही होत नाही हो, कुठेही नाही,असं महाराष्ट्रतही होत नाही आमच्या फक्त कोकणात होतं, आमचं कास आहेय कोकणी माणूस आमचा शोषिक आहे,साधा आहे,भोळा आहे,कुणाला काही प्रश्न विचारत नाही,रागावत नाही, चिडत नाही काही करत नाही, या असल्या न चिडणाऱ्या,संवेदनशीलनात असणाऱ्या लोकांचं नेतृत्व मला नाही करायचं, तुम्हाला याच्यात सुख मानायचे असल्यास सुख माना, पण प्रगती काय असते, विकास काय असतो,डेव्हलपमेंट कशाला म्हणतात हे एकदा राज ठाकरेच्या हाती सत्ता देईन बघा तुम्हाला दाखवतो डेव्हलपमेंट म्हणजे काय असते ती,प्रगती काय असते ती, अहो कसला केरळ आणि गोवा घेऊन बसलाय सगळ्यांना मागे टाकू आपण,आणि पुढे निघून जाऊ आपण इतकी ताकद या संपूर्ण कोकणामध्ये आहे,पण तुम्ही निवडून दिलेल्या माणसांमध्ये आजपर्यंत ती इच्छा शक्ती न्हवती आणि ती नाहीहेय,

**इतकं कसं रे तुम्ही बोळसट....!**

ह्याने एकदा सांगतो जगामध्ये जी युद्ध झाली ना,ज्याला आपण इतिहास म्हणतो ना तो इतिहास हा भूगोलातून हाय,इतिहास म्हणजे काय असतो, आपण काय इतिहास वाचतो, हिटलरने काय केलं,तर भु प्रदेश त्याने पालाक्रांत केला, संपादन केला, मिळवला जिंकला,जो आतापर्यंत इतिहास तुम्ही जो वाचत आलात ना सगळा,तो सगळा जमनींशी निगडित आहे,तो सगळा भूगोलाशी निगडित आहे,जमीन,जमीन्या ताब्यात घेणे, याच्या मध्ये फक्त महाराष्ट्रातीलचं लोक नहीहेत ,बाहेरच्या राज्यामधील लोक आहेत,ते तुमच्या जमनी घेताहेत,त्या मामुली किंमतीत घेऊन तुम्हाला नेस्तनाबूत करताहेत,तुमचं अस्तित्व मिटवताहेत, इतकं कसं रे तुम्ही बोळसट पणाने या सर्व गोष्टींकडे तुम्ही बघू शकता, आमच्याकडे उद्योग धंदे येत नहीहेत, आमच्याकडची मुले बाहेर जाताहेत,आमच्याकडच्या जमनी विकल्या जाताहेत,आम्ही शांतपणे बघत बसलो आहोत ह्या गोष्टींकडे आणि दुर्दैव हे की ज्यांना तुम्ही आजपर्यंत निवडून दिलंत, ज्या पक्षाना आजपर्यंत निवडून दिलंत व्यवहार तेच करतायत,तुमचं तुम्हालाच समजलं पाहिजे, बाकी सगळे तुमची जमीन हडप करण्यासाठी उभे आहेत, आणि हा राज ठाकरे सांगतोय तुमच्या जमिनींवर उत्कर्ष करून दाखवतो तुम्हाला प्रगती आणून दाखवितो, आणि खरंच मी दाखवितो, जे जगात मी पहायलंय ते या कोकणात आणायचंय, पेशव्यांनी ज्याला आपण मराठा साम्राज्य म्हणतो हे अटकेपार नेलं, या देशावरती हया संपूर्ण हिंद प्रांतावरती राज्य केलं तो राज्य करतानाचा जो मंत्र होताना तो तीन अक्षरात होता त्या मंत्राचं नाव होतं शिवाजी अशी परंपरा लाभलेला आपला महाराष्ट्र नेभळट पणे बसलाय, शांतपणे बसलाय,आमच्याकडचे लोक वाटेल तसे वागताहेत,आपल्याकडचे राज्यकर्ते, राजकारणी कशेही वागताहेत,आणि तुम्ही शांतपणे ह्यांच्याकडे बघत बसलायत, तुम्ही जो पर्यंत ह्यांच्यात बदल करत नाहीत तो पर्यंत कोकणात बदल होणार नाही. आणि म्हणून मी एक तुम्हाला विनंती करण्यासाठी आज येथे आलो की येणाऱ्या २० तारखेला ही संधी तुम्हाला आलेली आहे त्याच्यानंतर परत पाच वर्षे तुमच्या आयुष्यातील गेली,पाच वर्षे परत काहीही नाही होणार, तुमचे जे मित्र कोणी परिवरातील असतील नातेवाईक असतील, इथे कोकणात राहत असतील, मुंबईत राहत असतील,जिथे जिथे तुम्ही जाल,तिथे तिथे याचा विचार करणे आणि प्रचार करणे गरजेचे आहे.२० तारखेला या महाराष्ट्रात बदल झाला नाही तर महाराष्ट्र बरबाद झाला म्हणून समजा,आणि म्हणून बांधवांनो, भगिनींनो इथे मी आवाहन करण्यासाठी उभा आहे, येत्या २० तारखेला जे मतदान होणार आहे त्या मतदानामध्ये माझे जे शिलेदार आहेत, प्रमोद गांधी, संतोष अबगुल,फैजल फोपेरे, आणि महाराष्ट्रात माझे जिथे जिथे शिलेदार उभे असतील त्या सर्व उमेदवारांना रेल्वे इंजिन या निशाणी समोरील बटण दाबून या

सर्वांना आपण प्रचंड मतांनी विजयी करावं असे सदर सभेतून राजसाहेब ठाकरे यांनी आवाहन केले आहे.

# निवडणूक कर्तव्यात कसूर, ५ कर्मचारी निलंबित....

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, ठाणे :** १४१ –उल्हासनगर विधानसभा मतदारसंघातील भरारी पथक क्र.३ व ६ मधील उल्हासनगर महानगरपालिकेचे कर्मचारी लिपिक, संकेत चनपूर, संदीप शिरसवाल व मुकादम, आण्णासाहेब बोरूडे तसेच या पथकातील पोलीस कर्मचारी पोलीस हवालदार विश्वनाथ ठाकूर आणि पोलीस नाईक राजरत्न बुकटे यांच्यावर निवडणूक कर्तव्यात कसूर केल्याने निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा यांच्याद्वारे दि.०८ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्यावर तातडीने निलंबनाचीही कारवाई करण्यात आली आहे.

बबन आमले, रा.भांडूप (पश्चिम) हे दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी पहाटेच्या सुमारास म्हारळ नाका, उल्हासनगर नं.१ या ठिकाणाहून त्यांचे मित्र नितीन शिंदे यांच्यासह त्यांच्या इर्टिगा कार मधून अहमदनगर व पुणे जिल्हयातील फूल उत्पादक शेतकऱ्याकडील फूल मालाची विक्री करून त्या मालाचे पैसे त्यांना घरपोच देण्यासाठी रोख स्वरूपात रक्कम रू.७ लाख ५० हजार घेवून जात असताना भरारी पथकाचे प्रमुख संदीप शिरसवाल व संकेत चनपूर यांनी आमले यांच्याकडील पैशाबाबत तुमच्यावर गुन्हा दाखल होईल, पैसे जप्त करून ते परत मिळणार नाही अशी भिती घालून या रक्कमेपैकी रक्कम रू.८५ हजार काढून घेतले.




ही घटना दि.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी घडल्यानंतर संबंधित व्यक्तीने पोलीस उप–आयुक्त यांच्याकडे दि.१९ ऑक्टोबर २०२४ रोजी तक्रार दाखल केली होती. या घटनेचे गांभीर्य पाहता याबाबत पोलीस विभागाने अधिक तपास करून संपूर्ण घटनेचा अहवाल १४१–उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा यांच्याकडे सादर केला. पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–४ यांनी याबाबत तपास करून व संबंधितांचे जाबजबाब नोंदवून घेवून दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी उल्हासनगर महानगर पालिका आयुक्त व १४१–उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा यांना प्रथम अहवाल सादर केला होता. संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब केला असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शर्मा यांनी दि.३१ ऑक्टोबर २०२४ रोजी संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करण्यासाठी संबंधित विभागांना अहवाल पाठविला. भविष्यात पुन्हा असा प्रकार होवू नये, यासाठी प्रशासकीय कारवाईसोबतच संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची कठोर कारवाई निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आली.

संबंधितांवर प्रशासकीय कारवाई सुरू असताना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांना दि.०८ नोव्हेंबर २०२४ रोजी ही घटना समजल्यानंतर त्यांच्यामार्फत तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे निर्देश देण्यात आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शर्मा यांच्याकडून संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर दि.०८ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय शिस्तभंग विषयक कारवाई करणेबाबत पाठविलेल्या अहवालाच्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त व पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–४ यांनी संबंधित पाचही कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. तसेच भरारी पथक क्र.३ व ६ मध्ये तातडीने नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे.

निवडणूक कर्तव्यावर असलेल्या सर्व पथकांनी, अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेले निवडणूकीचे काम योग्यरित्या व नि:पक्षपाती करणेबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी कडक निर्देश दिले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी शिनगारे यांच्या या कठोर कारवाईमुळे मतदारसंघातील सर्वच पथक सतर्क झाले आहेत.

# माझे सर्वस्व व नेतृत्व विखे कुटुंब : पै.युवराज पठारे

## काशिनाथ दाते यांना पारनेर शहरातून मताधिक्य देणार...

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्याच्या राजकारणात वेगवेगळ्या घटना घडत आहेत. विखे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे नगरसेवक पै. युवराज पठारे हे महाविकास आघाडी मध्ये प्रवेश करणार अशा स्वरूपाच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर नगरसेवक पठारे यांनी पारनेर येथे पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली आहे.

यावेळी पै. युवराज पठारे म्हणाले मी पारनेर नगरपंचायत चा नगरसेवक असून आमचे पठारे कुटुंब गेल्या अनेक दिवसापासून तालुक्यात व पारनेर शहराच्या राजकारणात व समाजकारणात सक्रिय आहे. आम्ही विखे कुटुंबाशी बांधील असून मी माझे सर्वस्व व नेतृत्व विखे कुटुंब समजतो हीच आमची ओळख आहे. मी माझ्या घरगुती वैयक्तिक कारणामुळे सध्या सक्रिय राजकारणामध्ये नव्हतो त्यामुळे माझ्याबाबत माध्यमांमध्ये विविध चर्चा व प्रतिक्रिया निर्माण झाल्या त्या अनुषंगाने मी पत्रकार परिषद घेत असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकी मध्ये मी



महायुतीच्या उमेदवारा बरोबरच आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांना पारनेर शहरांमधून भरगोस मताधिक्य देणार आहे. असे नगरसेवक पै युवराज पठारे पत्रकार परिषदेमध्ये म्हणाले यावेळी बोलताना ते पुढे असे म्हणाले की, पारनेर तालुक्यामध्ये माझा मोठा मित्रपरिवार आहे तसेच आमचे पाहुणे नातेवाईक यांना सुद्धा संपर्क करून काशिनाथ दाते सर यांनाच मतदान करण्यासाठी प्रोत्साहन देणार असून महायुतीचा हा उमेदवार मोठ्या मताधिक्याने पारनेर तालुक्यात निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच या पुढील काळात पारनेर शहराच्या विकासासाठी व प्रामुख्याने पारनेरच्या पाणी योजने संदर्भात काम करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे नगरसेवक पै. युवराज पठारे यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

पारनेर येथे पत्रकार परिषद घेऊन नगरसेवक पठारे यांनी एक प्रकारे शक्ती प्रदर्शन करत महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते सर यांच्या प्रचार यंत्रणेत सहभागी होत काम सुरू केले आहे. पारनेर येथे पत्रकार परिषद घेण्यात आली यावेळी महायुती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पारनेर नगर विधानसभेचे अधिकृत उमेदवार काशिनाथ दाते सर भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे भाजपा पारनेर तालुका अध्यक्ष राहुल शिंदे लाडकी बहीण योजना समितीचे तालुका अध्यक्ष सुनील थोरात, नगरसेवक पै युवराज पठारे, नगरसेवक नवनाथ सोबले, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पठारे, नगरसेवक अशोक चेडे, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे, भाजपा तालुका खजिनदार किरण कोकाटे, दूध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार सरपंच लहू भालेकर भाजप नेते संतोष शेलार, सागर मैड, शिवसेना शिंदे गटाचे पारनेर शहर प्रमुख राजेंद्र ठुबे, आरपीआयचे पारनेर शहराध्यक्ष प्रदीप नगरे, संदीप घोडके–औटी, संजय मते, सुनील म्हस्के बाळासाहेब देशमाने, भिमाजी औटी, विकास रोकडे, अमोल रोकडे, संतोष शिंदे, रवींद्र गागरे, धनंजय ढोकळे, मनीषा पठारे सुवर्णा औटी, रोहिदास शेरकर, सचिन तराळ, संभाजी कोल्हे, भूषण देशमाने, शुभम कुलट, प्रवीण पठारे, यशवंत पठारे, सुहास औटी, स्वप्नील औटी, संदीप सोबले, निहाल काळे, मंगेश कानडे, हरिभाऊ ठाणगे, पांडुरंग औटी, कचरू औटी, ज्ञानेश्वर सोबले, प्रवीण चव्हाण, स्वप्निल कावरे, मनोज बोरुडे, स्वप्निल देशमाने, संजय कुलट, अनिल चौगुले, गोरख चौधरी, संतोष ठाणगे, प्रवीण भिसे, छबन औटी, सुजित खोसे, नामदेव उचळे, गोरख शिंदे, अरुण गागरे, कृष्णकांत खामकर सर आदी महायुतीचे कार्यकर्ते पै. युवराज पठारे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीत भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार विजयाची हॅट्रिक मारणार काय?

## वणी विधानसभा निवडणुकीत उमेदवारांनी केली प्रचाराला सुरुवात

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१०, झरी (यवतमाळ) :** वणी विधानसभा मतदारसंघ हा चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे. महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्यात आहे. ही विधानसभा निवडनुक अटीतटीची रंगतदार होणार आहे. या निवडणुकीच्या आखाड्यात बारा उमेदवार राजकीय भविष्य अजमावत आहे. चौरंगी लढत असल्याचे चित्र आहे. महायुती विरूद्ध महाविकास आघाडी असा निवडणुक आखाडा रंगला असून मनसे सह दिग्गज अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरले आहे.

वणी विधानसभेच्या रिंगणात डझनभर उमेदवार राजकीय भविष्य आजमावणार आहे. यात भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार, शिवसेना (उबाठा) चे संजय देरकर, अपक्ष संजय खाडे, मनसेचे राजू उंबरकर, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे अनिल हेपट, वंचित बहुजन आघाडीचे राजेंद्र निमसटकर, बहुजन समाज पार्टीचे अरूण कुमार खैरे, अपक्ष हरीष पाते, अपक्ष केतन पार्खी, अपक्ष नारायणन गोडे, अपक्ष निखिल ढुरके, अपक्ष राहुल आत्राम, यांचा समावेश आहे. मागिल झालेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल पाहता भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार यांना २०१४ मध्ये ४११७८ मते मिळवित विजय झाला तर १०१९ मध्ये ६७७१० मते मिळवित विजयाचे मानकरी ठरले. दोन टर्म सातत्याने वणी विधानसभेवर भाजपच सरस ठरला. त्यामुळे पुन्हा एकदा २०२४ विधानसभेच्या निवडणुकीत भाजपचे संजीव रेड्डी बोदकुरवार हॅट्रिक मारणार काय याकडे तमाम जनतेचे लक्ष लागले आहे. मागिल २००९ मध्ये कांग्रेस पक्षाच्या ताब्यात गेलेला गड तेव्हा २०१४ मध्ये संजीव रेड्डी बोदकुरवार यांनी ४११७८ मते मिळवित वामनराव कासावार व विश्वास नांदेकर दिग्गज नेत्यांचा पराभव करीत विजयी झाले. विधानसभा निवडणुकीत गेल्या दोन पंचवार्षिक टर्म पासून कांग्रेस पक्षाला पराभवाचा सतत सामना करावा लागल्याचे पहायला मिळाले. २००४ च्या निवडणुकीत मध्ये विश्वास नांदेकर यांनी ६० हजार पेक्षा अधिक मते मिळवित विजयी झाले होते. त्यामुळे त्यांचा पाठींब्याला कमी लेखता येणार नाही. यावेळेसही २०२४ विधानसभेच्या निवडणुकी करीता कांग्रेस तर्फे उमेदवारी साठी जोरदार प्रयत्न केले गेले मात्र अपयशी ठरले. आता मात्र शिवसेना (उबाठा) चे संजय देरकर यांना उमेदवारी दिली आहे. महाविकास आघाडीतील मित्र पक्ष म्हणून कांग्रेस पक्षही संजय देरकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. संजय देरकर हे मागिल अनेक पंचवार्षिक विधानसभा निवडणुक सातत्याने लढवित असल्याने निवडणुकांचे पक्के अनुभवी आहे. २००९ मधील विधानसभा निवडणुकीत ४१ हजार पेक्षा अधिक मते संजय देरकर यांना मिळविता आली. त्यावेळी ते अपक्ष उमेदवार होते. सध्या निवडणुक वातावरण चांगलेच तापले असून निवडणुकीत कोण बाजी मरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वणी विधानसभा क्षेत्रात कुणबी समाज बहुसंख्येने आहेत. निवडणुकीच्या आखाड्यातील काही उमेदवार मतांचे विभाजन व्हावे म्हणून कुणबी समाज कार्ड खेळू पाहात आहे. मात्र त्यांनीही सावध भुमिका घेतल्याचा अंदाज येत आहे. संजय खाडे अपक्ष उमेदवार रिंगणात असल्याने त्यांची निवडनुक खेळी निर्णायक ठरणार आहे. तसेच निवडणुकीत महत्वाची भूमिका समजले जाणारे मनसेचे उमेदवार राजू उंबरकर यांचा मागिल विधानसभा निवडणुकीत मतदान मिळवण्याच्या संख्येचा आकडा चढ उतार आहे. मनसेचे राजू उंबरकर यांना २००९ मध्ये ११३२० मते मिळाली. २०१४ मध्ये २७०५४ मते मिळाली.२०१९ मध्ये १६११५ मते मिळवण्या पर्यंत मजल मारता आली. परंतु यावेळी मात्र चौरंगी लढत असल्याने मनसेचे उमेदवार राजू उंबरकर यांना सूद्धा विजय दुर नसल्याचे बोलले जात असल्याच्या चर्चा आहे. निवडणुकीच्या आखाड्यात बारा उमेदवार पैकी कोण बाजी मरणार हे २३ नोव्हेंबरच्या निकाला नंतरच कळणार आहे.

खरं तर निवडणुका म्हणजे केवळ सत्तेची लढाई नव्हे तर एक समाजसेवेची विकासाची आणि सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात विविध समस्यांच्या निराकरणाची लढाई आहे. आजचा काळ हा विचार करणारा काळ आहे. सत्तेवर येण्यासाठी राजकारणी मुळ विषयापासून दुर ठेवत जनतेचे लक्ष विचलित करीत असल्याचे वाटत आहे. त्यामुळे तालुक्यातील मतदारांनी सुद्धा या खेळाचे उत्तरदायित्व ठरवून योग्य निर्णयाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे.

# थोडक्यात

## जिल्हा बँकेच्या कान्हुरपठार शाखेत गैरव्यवहार : अक्षय ढोकळे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कान्हुरपठार येथील जिल्हा सहकारी बँकेच्या शाखेमध्ये सन २०१४ ते सन २०२३ या वर्षात तत्कालीन तालुका विकास अधिकारी इंद्रभान शेळके यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी व इतर शासकीय योजनांचे अनुदान परस्पर आपल्या खात्यावर वर्ग केले,याची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी बँकेचे माजी कर्मचारी अक्षय ढोकळे यांनी केली आहे. यासंदर्भात निवेदन जिल्हा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे व जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांना देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले की, शेतकरी सभासदांच्या शासनाच्या सर्व योजनांचे अनुदान, विमा, नुकसान भरपाई रक्कमा, कर्जमाफी तसेच कर्जमाफी प्रोत्साहन अनुदान आपल्या बँकेमार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्याची जबाबदारी बँकेवर आहे. तथापि, सहकारी बँकेमध्ये तत्कालीन तालुका विकास अधिकारी इंद्रभान शेळके यांच्या कान्हुरपठार, पारनेर येथील बचत खात्याचे स्टेटमेंट पाहिले असता पगाराव्यतिरिक्त अनेक रकमा जमा झाल्याचे दिसून आले आहे. या रकमा कान्हुरपठार शाखेंतर्गत असलेल्या सर्व सोसायटीच्या सभासदांच्या असून, या आपल्या अधिकारांचा वापर करून स्वखाती जमा केलेल्या दिसून येत आहे. याबाबत चौकशी करून बँकेतर्फे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाला असून, त्यावर चौकशी चालू केली आहे. पुढील काही दिवसांत चौकशी पूर्ण होऊन अहवाल वरिष्ठांना सादर केला जाईल.
**–– रावसाहेब वर्पे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा बँक**

सन २०१४ ते २०२३ पर्यंत शेतकरी विमा रकमांची अफरातफर चालू असताना वरिष्ठ कार्यालयामार्फत शेळके यांच्यावर योग्य ती कारवाई होणे अपेक्षित होते. कारवाई न होता पदोन्नती मिळाली आहे. नि:ष्पक्ष चौकशी करून कारवाई करावी
**–– अक्षय ढोकळे, माजी कर्मचारी, जिल्हा बँक**

## महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरविणार - राणीताई लंके

### कान्हुरपठार येथील घोंगडी बैठकीत दिली ग्वाही !



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०,पारनेर (अहिल्यानगर) :** कान्हूरपठार व परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत असून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी आपण विधानसभेत आवाज उठवून शास्वत पाणी योजना माग लावण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावू, अशी ग्वाही महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांनी दिली. लंके यांच्या प्रचारार्थ आयोजित बैठकीसाठी राणी लंके या कान्हूर पठारमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांचे मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले. लंके म्हणाल्या, सन २०१९ मध्ये खा. नीलेश लंके यांना मतदारांनी मोठया मताधिक्क्याने विधानसभेत पाठविल्यानंतर त्यांनी त्या पदाला न्याय दिला. मतदारसंघात हजारो कोटी रूपयांची कामे माग लावली. कोणत्याही लोकप्रतिनिधीने मतदार संघात साडेचार वर्षांच्या कालखंडात इतक्या मोठया प्रमाणात विकास कामे माग लावलेली नाहीत. प्रत्येक गावाला विकास कामे देण्याचा प्रयत्न केला गेला. विकास कामे देताना कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता कामे मंजूर करण्यात आली. असे असतानाही विरोधक विकास कामांबाबत चर्चा करतात ती हस्यास्पद आहे. राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनीच लोकसभा निवडणुकीदरम्यान खा. लंके यांनी मतदारसंघासाठी किती निधी खेचून आणला याबाबत सांगितलेले असताना विकास कामांबाबत स्वतः कडे सांगण्यासारखे काही नसताना नागरीकांची दिशाभूल करण्याचे काम विरोधक करत असल्याचे लंके यांनी सांगितले. या वेळी चंद्रभान ठुबे, किरण ठुबे, बाबासाहेब घुमटकर, प्रसाद नवले, धनंजय ठुबे, शिवाजी व्यवहारे, सरपंच संध्या ठुबे, माजी सरपंच गोकूळ काकडे, मा. उपसरपंच सागर व्यवहारे, विशाल लोंढे, वैभव साळवे, बापू चत्तर, श्रेयश घोडके, तुषार सोनावळे, सुरज नवले, गणेश तांबे, ज्ञानेश्वर गायखे, श्रीकांत ठुबे, राणी घुमटकर, गीतांजली ठुबे, सुशिला ठुबे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई विमानतळावरून पावणेतीन कोटींचे सोने जप्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर महसूल गुप्तवार्ता संचलनालयाने (डीआरआय) शनिवारी केलेल्या कारवाईत साडेतीन किलो सोने जप्त केले. अबुधाबी येथून या सोन्याची तस्करी करण्यात आली होती. याप्रकरणी डीआरआयने दोन कर्मचाऱ्यांना अटक केली.

जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत सुमारे पावणेतीन कोटी रुपये आहे. अबुधाबी येथून मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर येणाऱ्या विमानातून सोने आणण्यात येणार असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. त्यानुसार डीआरआयने शनिवारी विमानतळावर सापळा रचला होता. विमानतळावरून दोन कर्मचाऱ्यांना सोन्यासह ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून ३५०२ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले असून त्याची किंमत दोन कोटी ६७ लाख ४९ हजार ७८० रुपये आहे. आरोपींकडून उपाहारगृहात सोने स्वीकारण्यासाठी एक व्यक्ती येणार होती. पण त्यापूर्वीच त्यांना अटक झाली.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी विमातळावर सुविधा पुरवणाऱ्या कंपनीतील कर्मचारी असल्याचे सूत्रांनी सांगितले. याप्रकरणी डीआरआय अधिक तपास करीत आहे.